

Dissemination of Education for Knowledge, Science and Culture.

-Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

Dept. of History

# NOTICE

Date: 07 / 10 / 2022

The students of M.A. Part-I in the History Department of Vivekananda College are informed that an Unit test on Chapter 1 (19th Century India) of the subject "History of Social Reformers in India" will be conducted on Monday, 10th October, 2022. The test will take place from 1:00 PM to 2:00 PM in Room Number 24. All students are requested to be present on time with their preparation and necessary reference materials for the test.

Dr. S. R. Kattimani

**H.O.D.**
**Department of History**
**Vivekanand College, Kolhapur (Autonomous)**

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

M.A.-I Semester- I

CONTINUOUS INTERNAL EXAMINATION

Subject- History

Title-History of Social Reformers in India Paper No- IV

Subject Code- CC 2703 A

| | |
|---|---|
| **Date:** 10th Oct.2022 | Day: Monday |
| Time: 1.00 pm to 2.00 pm | Total Marks: - 20 |
| **Type of Test:** | Unit Test |
| **Additional Info:** | |
| Module-1: | 19th Century India |

**Que. Analyse the Indian social life in the 19th century.**

**(20 marks)**

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

M.A.-I Semester- I

CONTINUOUS INTERNAL EXAMINATION

Subject- History

Title-History of Social Reformers in IndiaPaper No- IV

Subject Code- CC 2703 A

| | |
|---|---|
| Date:10thOct.2022 | Day: Monday |
| Time: 1.00 pm to 2.00 pm | Total Marks: - 20 |
| **Type of Test:** | Unit Test |
| **Additional Info:** | |
| Module-1: | 19th Century India |

Mark List of Students

| Sr. No. | Roll No | Marks | Sr. No. | Roll No | Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 7035 | 15 | | | |
| 2 | 7036 | 18 | | | |
| 3 | 7014 | 18 | | | |
| 4 | 7019 | 17 | | | |
| 5 | 7022 | 15 | | | |
| 6 | 7011 | 14 | | | |
| 7 | 7052 | 16 | | | |
| 8 | 7025 | 18 | | | |
| 9 | 7016 | 17 | | | |
| 10 | 7048 | 12 | | | |

Dr. S. R. Kattimani

**H.O.D.**
**Department of History**
**Vivekanand College, Kolhapur (Autonomous)**

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

15/20

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Signature of Supervisor:

Name - Rehana S. Mullani

Suppliment No.:

Subject :

Test / Tutorial No.:

Roll No. : 7035

Div.: 19 व्या शतकातील भारतीय समाज जीवनाचे सटीक विश्लेषण करा.

Class : MA I

प्र. १. 19 व्या शतकातील भारतीय समाज जीवनाचे सटीक विश्लेषण करा

→ सामाजिक सुधारणाची प्रक्रिया एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी भारतात सुरू होण्यास प्रामुख्याने पुढील काही गोष्टी कारणीभूत ठरल्या

भारतीय समाजातील अवनती दूर करणे

- ब्रिटिशाच्या नवीन शासनयंत्रणेने भारतात सकाळी अमल जाणारी राजवट येथे प्रस्थापित केली त्यांच्या राजवटीच्या व ब्रिटिश येथे प्रस्थापित केली काही भारतीयांनी त्याच्या भौतिक विकासाचे गमक लक्षात आले त्याच्या तुलनेने भारतीय समाजाची अवनती त्यांना प्रकर्षाने जाणवू लागली. भारतीय समाजात पसरलेली मरगळ नाहीशी करावयाची असेल तर त्या समाजात पाश्चात्य विचारांचे नवे वारे आणणे गरजेचे होते. त्यासाठी सामाजिक सुधारणा आवश्यक होत्या.

- प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाची गरज.

पौर्वात्य संस्कृती व ज्ञान यांचा सखोल अभ्यास करणाऱ्या काही अभ्यासकांनी आणि संशोधकांनी भारतात भूतकाळ किती श्रेष्ठ, उज्वल आणि अभिमानस्पद आहे याची लोकांना ओळख करून दिली सर विल्यम जोन्स, जेम्स प्रिनसेस, चार्लस विल्किन्स मॅक्समुल्लर या विद्वानांची प्राचीन भारतीय संस्कृतीचा मूलभूत संशोधनात्मक अभ्यास केला न्या. म. गो. रानडे राजा राममोहन रॉय राधाकांत देव राजेंद्रलाल मित्रा, भगवानलाल इंद्रजी हरिप्रसादजी

डॉ. आर. जी. भांडारकर इ. नी प्राचीन भारतीय संस्कृतीचा अत्यंत अभिमानस्पद ओळख करून दिली स्वामी विवेकानंद सारख्या थोर चिंतनशील व्यक्तींनी भारतीय अध्यात्मवादाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले. भूतकाळाकडे पाहण्याची नवीन उज्वल दृष्टी दिली.

- प्राचीन भारतीय वाङ्मयाचा अभ्यास व संशोधनाची गरज -

पौर्वात्य वाङ्मय व पाश्चिमात्य यांचा तुलनात्मक अभ्यास करून प्राचीन संस्कृत वाङ्मयातील महत्त्वपूर्ण गोष्टी आधुनिक साहित्यिकांसमोर ठेवल्या व त्यांनी जुन्या व नव्या वाङ्मयीन मूल्यांचा संयोग घडवून आणला. त्याचबरोबर ऐतिहासिक कार्यामुळे धार्मिक संशोधन करण्याची प्रेरणा मिळाली आणि सुधारणा या सातत्याने आवश्यक आहेत याची जाणीवही झाली.

हिंदू धर्माबाबत अभिमान जागृत करणे -

या काळातील महत्त्वाची बाब म्हणजे ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या सुरू केलेल्या शाळांमुळे शिक्षण घेणाऱ्या भारतीय तरुणांना उदारमतवादी पुरोगामी विचारसरणीचे बाळकडू इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून मिळू लागले या विचारप्रणालीत त्यांना भारतीय समाजाच्या पुनरुज्जीवनाची गुरुकिल्ली सापडली. कारण ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराचे कार्य करीत असताना हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा इ. वर कठोर टीका केली.

जातिसंस्था -

अनेक शतकांच्या पूर्वी समाजजीवनात असलेल्या चातुर्वर्ण्य पद्धतीने जातीसंस्थेत रूपांतर झालेले होते. जातिसंस्थेमुळे समाज निरनिराळ्या गटामध्ये विभागलेला होता. एका जातीत अनेक उपजाती निर्माण झाल्या होत्या. या जातीच्यामध्ये व्यवसायांच्या स्वरूपावरून किंवा देवदेवता व परंपरा यांच्याआधारे श्रेष्ठ - कनिष्ठ विचार समाजात प्रस्थापित झालेले होते परंपरेनुसार प्रत्येक जातीला त्याच्या स्थानानुसार काही हक्क, अधिकार, कर्तव्ये ठरवून दिली जाते. बहिष्कृत ही शिक्षा अत्यंत मानहानिकारक मानले जाई त्यामुळे १९ व्या शतकात जातिसंस्थेत अडकलेल्या व्यक्तीला समाजात स्वतंत्रपणे आचार - विचार करण्याचा अधिकार नव्हता

समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून व मानवतेच्या दृष्टीने आवश्यक असलेले मूलभूत हक्कही कनिष्ठ जातींना मिळत नसत. त्यामुळे त्यांची अवस्था तात्कालीन काळात अत्यंत दयनीय होती.

अस्पृश्यता -

या काळात जातिसंस्थेचा एक अविभाज्य घटक म्हणून अस्पृश्यतेकडे पाहिले जाई अस्पृश्य म्हणून मानल्या गेलेल्या समाजाला कष्ट बंधनाचे जीवन जगावे लागे या जातीला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. स्थिर राजकीय सत्तेमुळे व सामाजिक जीवनात स्थैर्य निर्माण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळे अनेक जमाती आपल्या परंपरागत व्यवसायापासून दूर झाल्या. या भिन्न जाती जमाती नागरीकरण होण्यास सुरुवात झाली. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय तरुणांना, इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चिमात्य आचारविचार व तत्वज्ञानाची माहिती झाली.

कुटुंबसंस्था -

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतातील समाजात कुटुंब हा सामाजिक जीवनाचा मूलभूत पाया होता. या काळात संयुक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात होती पितृसत्ताक पद्धती रूढ असल्याने कुटुंबातील वयोवृद्ध प्रमुखाची जबाबदारी मानली जाई. कुटुंबामध्ये आपल्या घराण्याच्या परंपरेच्या धर्माच्या बंधनांचा काटेकोर पालन करण्याचा रिवाज होता. शेती हाच या काळातील कुटुंबाचा व्यवसाय मानलेल्या असून शेतीवर कुटुंबातील पुरुष वारसदारांची सामुदायिक मालकी मानली जाई.
एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शहरी जीवनात विभक्त कुटुंबपद्धतीचे अस्तित्व निर्माण झाले असले तरी ग्रामीण जीवनात संयुक्त कुटुंबपद्धती प्रचलित होती.

स्त्रीजीवन -

एकोणिसाव्या शतकात भारतातील समाजाचा एक मूलभूत घटक म्हणून स्त्रियांच्याकडे पाहिले जात असले तरी त्यांना सामाजिक व कौटुंबिक प्रतिष्ठा नव्हती. अर्थात रमाबाई गोपिकाबाई व अहिल्याबाई या सारख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी स्त्रियांची प्रतिष्ठा होती तसेच राजघराण्यातील किंवा श्रीमंत वर्गातील काही स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार असला, सामाजिक व राजकीय जीवनात त्या सहभागी होत असल्या तरी सामान्य स्त्रियांची अवस्था दयनीय होती. या काळात बालविवाहाची पद्धत सुरु झाल्याने सर्व-सामान्य स्त्रियांचा शिक्षणाचा अधिकार नष्ट झाला.

पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना कौटुंबिक आणि सामाजिक ठिकाणी कोणत्याही प्रकारचे स्थान मिळत नव्हते. तसेच या काळात बहुपत्नीकत्वाची पद्धत रूढ झाली होती त्यामुळे पुरुष कोणत्याही वयात कितीही लग्न करु शकत असत. एवढेच नव्हेतर पुरुषांना विवाहबाह्य संबंध ठेवण्याचा अधिकार होता.

बहुपत्नीत्व व जरठकुमारी विवाहाच्या पद्धतीमुळे स्त्रियांचे जीवन अत्यंत दुःसह बनले होते समाजजीवन एक महत्त्वाचा घटक म्हणून स्त्री असून केवळ उपभोगाची वस्तू किंवा घरातील हक्काच्या गुलाम म्हणून स्त्रियांकडे पाहिले जाई.

धार्मिक शोषण -

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतातील धार्मिक जीवनात कर्मकांडाला महत्त्व प्राप्त झाले होते. व्रतवैकल्यामी न सोवळ्या ओवळ्याच्या नियमांना पराकोटीची सीमा गाठलेली होती. या समाजात विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. येथील सामाजिक जीवनावर धार्मिक आचार-विचारांचा प्रभाव होता. या काळातील समाजाच्या धार्मिक जीवनाचे विश्लेषण करताना लोकहितवादी आपल्या शतपत्रात म्हणतात.

हिंदु लोकात सांप्रत आचार फार माजला आहे म्हणजे केवळ निरर्थक कामे व ढोंगे फार होऊन त्यातील बीजरूपी जी नीती ती नष्ट झाली आहे.

१९व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत समाजात धर्माच्या नावांखाली चालत असलेल्या अनिष्ट चालीरीती रूढी-परंपरा यांनाच समाजधर्म मानण्यात प्रारंभ झालेला आहे.

18/20

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Signature of Supervisor | |
| Suppliment No. : | |
| Roll No. : 7036 | |
| Class : M.A.I | |
| Subject : | नाव :- वैष्णवी विठ्ठल निकम / विषय :- इतिहास |
| Test / Tutorial No. : | पेपर क्र. ५ भारतीय समाज सुधारणांचा इतिहास |
| Div. : | |

1. १९ व्या शतकातील भारतीय समाज जीवनाचे सविक विश्लेषण करा.

→ जातिसंस्था :-

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी समाजजीवनात असलेल्या चातुर्वर्ण्य पध्दतीचे जातिसंस्थेत रूपांतर झालेले होते. जातिसंस्थेमुळे समाज निरनिराळ्या गटांमध्ये विभागलेला होता एका जातीत अनेक उपजाती निर्माण झाल्या होत्या. या जातींच्यामध्ये व्यवसायांच्या स्वरूपावरून किंवा देवदेवता व परंपरा यांच्याद्वारे श्रेष्ठ - कनिष्ठ विचार समाजात प्रस्थापित झालेले होते. प्रत्येक जातीचे विशिष्ट स्थान निश्चित केलेले होते. त्यामुळे सामाजिक एकतेची जाणीव नाहीशी झालेली होती. जातिसंस्थेत जन्म हाच मुख्य घटक मानण्यात आल्याने व्यक्तीचे स्वातंत्र्य स्वातंत्र्य पूर्णपणे नष्ट झाले. त्यामध्ये ब्राम्हण जातीला त्यांच्या श्रेष्ठत्वातून विशेषाधिकार मिळाले होते. या वर्गाला ज्ञान संपादन करण्याची संधी मिळत असे. परंपरागत व्यवसाय करणे व वरिष्ठ जातींची सेवा करणे हेच कनिष्ठ वर्गाचे कर्तव्य समजले जाई. समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून व मानवतेच्या दृष्टीने आवश्यक असलेले मूलभूत हक्क ही कनिष्ठ जातींना मिळत नसत. त्यामुळे त्यांची अवस्था तत्कालीन काळात

अत्यंत दयनीय होती.

**अस्पृश्यता** :-

या काळात जातिसंस्थेचा एक अविभाज्य घटक म्हणून अस्पृश्यतेकडे पाहिले जाई. अस्पृश्य म्हणुन मानल्या गेलेल्या समाजाला कडक बंधनाचे जीवन जगावे लागे. या जातीला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. तसेच आर्थिक स्वयंपूर्णता निर्माण होण्यासारखी त्यांची स्थिती नव्हती. त्यांना गुलामाप्रमाणे जीवन जगणे भाग पडे. अस्पृश्य जातीच्या स्पर्शाने विटाळ होतो की ही कल्पना सामाजिक जीवनात दृढ झालेली होती.

एकोणिसाव्या शतकाच्या अगोदर भारतीय समाजाचे जातिसंस्थेद्वारे झालेले विघटन ब्रिटीशांना भारतात आपली सत्ता प्रस्थापित करण्यास उपयुक्त ठरली. परकीय सत्तेला केवळ समाजातील श्रेष्ठ जातीकडुनच भविष्यकाळात विरोध होण्याची शक्यता जाणवल्यानेच ब्रिटीशांनी या जातींना विशेष सवलती देऊन प्रशासनात सहभागी करून घेण्याचे व काही काळ त्यांचे परंपरागत अधिकार कायम टिकवण्याचेच धोरण स्विकारले.

**कुटुंबसंस्था** :-

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस भारतातील समाजात कुटुंब हाच सामाजिक जीवनाचा मूलभूत पाया होता. या काळात संयुक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. कुटुंबातील सर्व सदस्यांचे पालनपोषण करणे ही कुटुंबप्रमुखाची जबाबदारी मानली जाई. शेती हाच या काळातील कुटुंबाचा व्यवसाय मानलेला असुन शेतीवर कुटुंबातील पुरुष वारसदाराची सामुदायिक मालकी मानली जाई. कुटुंबातील परंपरागत हक्क, अधिकार स्त्री संपत्तीची वाटणी या संबंधीच्या बाबतीत न्याय देण्याचे काम गोतसभा, ग्रामसभा किंवा धर्मपंचायत करीत. ब्रिटीशांची सत्ता भारतात स्थापन झाल्यानंतर येथील कुटुंबसंस्थेच्या स्वरूपामध्ये काही प्रमाणात बदल झाले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शहरी जीवनात विभक्त कुटुंबपद्धतीचे अस्तित्व निर्माण झाले असले तरी ग्रामीण जीवनात संयुक्त कुटुंबपद्धतीच प्रचलित होती.

स्त्री जीवन :-

एकोणिसाव्या शतकात भारतातील समाजाचा एक मुलभूत घटक म्हणुन स्त्रीयांच्याकडे पाहिले जात असले तरी त्यांना सामाजिक व कौटुंबिक प्रतिष्ठा नव्हती अर्थात राधाबाई, गोपिकाबाई व अहिल्याबाई या सारख्या हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या स्त्रीयाना समाजात प्रतिष्ठा होती. या काळात बालविवाहाची पद्धत सुरु झाल्याने सर्वसामान्य स्त्रियांचा शिक्षणाचा अधिकार नष्ट झाला. पित्याच्या किंवा पतीच्या कुटुंबात ही स्त्रीचे महत्त्व कमी होत गेले. तसेच या काळात बहुपत्नीकत्वाची पद्धत रुढ झाली होती. त्यामुळे पुरुष कोणत्या ही वयात किती ही लग्न करु शकत असे. बहुपत्नीत्वाच्या व जरठकुमारीच्या विवाहाच्या पद्धतीमुळे स्त्रीयांचे जीवन अत्यंत दुःखद बनले होते. समाज जीवनात एक महत्वाचा घटक म्हणून स्त्री असुन केवळ उपभोगाची वस्तू किंवा घरातील हक्काचा गुलाम म्हणुन स्त्रीयाकडे पाहिले जाई

सामाजिक वर्ग :-

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस आर्थिक स्थितीवर आधारलेले दोन वर्ग होते. श्रीमंत आणि गरीब. श्रीमंताची समाजातील संख्या कमी होती. तर गरीबांची संख्या जास्त होती. श्रीमंत वर्गामध्ये प्रामुख्याने वतनदार, देशमुख, जमिनदार, इनामदार, जहागीरदार, पाटील, प्रशासकीय अधिकारी व व्यापारी वर्ग इ. समावेश होता. सामाजिक विषमता निर्माण झाली होती. बहुसंख्य समाज हा खेड्यात ~~सहज~~ रहात असुन त्यांच्या दैनंदिन गरजा मर्यादीत असुन त्या पूर्ण करणे त्यांना अशक्य होत असे. शेतकरी व शेत मजुरांच्या बरोबर सर्व समाजाच्या गरजा भागविणारे निरनिराळे व्यावसायिक समाजात होते. त्यांचे जीवन शेतीतून येणाऱ्या उत्पन्नावर अवलंबुन असे ब्रिटीशांचे भारतात आगमन झाल्यानंतर येथील सामाजिक विषमतेमध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल झालेले नव्हता. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ब्रिटीशांनी भारत ही एक वसाहत मानली होती. त्याची लूट करून संपत्ती इंग्लंडला नेहणे हाच त्यांचा मुख्य उद्देश होता.

**शिक्षण :-**

भारतात प्राचीन काळात नालंदा, तक्षशीला सारख्या विद्यापीठ परंपरा विकसित झाल्या होत्या. परंतु इस्लामी आक्रमणानंतर हि परंपरा खंडीत झाली होती. ब्रिटीशांच्या आगमनाच्या आधीदर भारतात काही पाठशाळा व मदरसा अस्तित्वात होत्या. समाजातील वरिष्ठ वर्ग, श्रीमंत आणि राजघराण्यातील व्यक्ती शिक्षण घेत. समाजातील कनिष्ठ वर्गाला किंवा स्त्रीयांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता.

ब्रिटीशांनी भारतात आपली राजकीय सत्ता स्थिर केल्यानंतर येथील समाजाच्या विकासाच्या हेतूने शिक्षण प्रसाराला गती मिळाली. कनिष्ठ वर्गालाही शिक्षणाची द्वार खुली झाली. ब्रिटीशांनी शैक्षणिक प्रगती मागील मूळ भावना प्रशासकीय कामकाजासाठी लागणारा कारकून वर्ग भारतीय समाजातून मिळावा हा हेतू होता.

**धार्मिक जीवन :-**

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतातील धार्मिक जीवनात कर्मकांडांना महत्त्व प्राप्त झाले. या काळात धर्माची मूलभूत तत्वे समाजापासून अलिप्त झाली होती. आणि परंपरा व्रतवैकल्य, कर्मकांड इ. ना विशेष महत्व प्राप्त झाले होते. या काळात बहुसंख्य हिंदु धर्मीय लोक व काही प्रमाणात बौद्ध, जैन, इस्लाम धर्माचे लोक होते. येथील सामाजिक जीवनावर धार्मिक आचार-विचारांचा प्रभाव होता. या काळातील समाजाच्या धार्मिक जीवनाचे विश्लेषण करताना लोकहितवादी आपल्या शतपत्रात म्हणतात. "हिंदू लोकांत संप्रत आचार फार माजला आहे. म्हणजे किरकोळ निरर्थक कामे व ढोंगे फार होऊन त्यातील बीजरूपी जी क्रिती ती भ्रष्ट झाली आहे. धार्मिक जीवनाचे स्वरूप पाहिल्यास रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचे धार्मिक जीवनात अस्तित्व होते आणि सामाजिक जीवनावर धार्मिक आचार व विचारांचा प्रभाव होता. असे दिसून येते.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Signature of Supervisor

Suppliment No. : 1

Roll No. : 7036

Class : M.A.I

Subject : भारतीय समाज सुधारणांचा

Test / Tutorial No. : इतिहास

Div. :

## ग्रामीण समाज जीवन :-

19 व्या शतकाच्या प्रारंभीचा विचार केला तर बहुतांशी समाज हा ग्रामीण भागात किंवा खेड्यांमध्येच आपले जीवन व्यतीत करीत होता. या काळात दळणवळणाची साधने फारशी उपलब्ध नसल्याने या ग्रामीण भागांचा शहरी किंवा नागरी जीवनाशी फारसा संबंध येत नसे परिणामी नवविचार, आधुनिकता यांची त्यांना जाणीव ही झालेली नव्हती. खेड्या खेड्यांमध्ये ही अंतर असल्याने त्यांचा फारसा संबंध येत नसे. संबंध आलाच तर यात्रा - जत्रा या निमित्ताने येत असे. या खेड्याच्यामध्ये आर्थिक स्वयं स्वयंपूर्णता निर्माण झालेली होती. या समाजाचा शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. तसेच येथील समाजाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवा व वस्तू खेड्यातच उपलब्ध होत असे. उदा. कुंभार, सुतार, चांभार, परिट, न्हावी, महार व रामोशी इ. थोडक्यात बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार पध्दती रुढ होती. ग्रामीण समाजात जातिसंस्थेचे अस्तित्व असुन हा समाज जाती व उपजातींमध्ये विभागलेला होता. प्रत्येक जातीने परंपरागत चालत आलेला व्यवसाय करणे व धार्मिक आचारांचे पालन करणे आवश्यक मानलेले होते. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना कोणतेही अधिकार दिलेले नव्हते.

## समाजाची सांस्कृतिक प्रगती :-

भारतात ब्रिटीश सत्ता स्थापन होण्यापूर्वी राजकीय जीवनात अस्थिरता व अशांतता निर्माण झाली होती. राजकीय जीवनातील या अस्थिरतेमुळे या काळात सांस्कृतिक विकासाला फार मोठी चालना मिळाली नव्हती. तसेच या काळात विद्वान, साहित्यिक व कलाकार यांना राजाश्रय नसल्यामुळे वरील प्रत्येक क्षेत्रात स्वतंत्रपणे मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली दिसुन येत नाही. महाराष्ट्रात मराठ्यांच्या सत्तेच्या काळात किल्ले, गड, कोट, वाडे, यांच्या बांधकामा शिवाय या स्थापत्या शिवाय कोणत्याही प्रकारच्या मोठ्या प्रमाणात विकास झालेला नाही. साहित्याच्या क्षेत्रात परंपरागत साहित्यालाच महत्त्व मिळाले होते. त्यामध्ये निरनिराळ्या प्रादेशिक भाषेतून या काळात मोठ्या प्रमाणावर साहित्याच्या निर्मितीला गती मिळालेली होती. मिर्झा गालीब सारखे प्रसिद्ध उर्दु कवी या काळात झाले. मराठी भाषेतून या काळात मोठ्या प्रमाणावर संत साहित्याच्या निर्मितीला गती मिळाली. पेशवाईच्या उत्तरार्धात रामजोशी, होनाजी बाळा व प्रभाकर इत्यादी नी मोठ्या प्रमाणावर शृंगार व वीर रसांनी भरलेल्या साहित्याची निर्मिती झाली. समाजाच्या मनोरंजनासाठी म्हणून संगीत, नृत्य इ. कलांचा या काळात विकास झाला असला तरी सांस्कृतिक क्षेत्रात या कलांना फार प्रभावी स्थान मिळालेले दिसुन येत नाही.

18/20

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
–शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Suppliment No. : Akanksha Anil Ghunkikar | Signature of Supervisor : |
| Roll No. : 7014 | Subject : History |
| Class : MA (I) | Test / Tutorial No. : भारतीय समाजसुधारणा- |
| | Div. : कार्य इतिहास . |

* १९ व्या शतकातील भारतीय समाजजीवनाचे सविस्तर विश्लेषण करा .

आधुनिक भारताच्या इतिहासात एकोणीसावे शतक हे एक वैशिष्ट्यपूर्ण शतक आहे. भारतीय राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवनाला वैशिष्ट्यपूर्ण वळण देण्याचे तसेच समाजात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याचे कार्य या शतकाने केले. ब्रिटीशांच्या भारतातील आगमनाने भारतात प्रामुख्याने प्रबोधनाचा व पुनरुज्जीवनाचा कालखंड सुरु झाला. इंग्रज शिक्षणाची सुरुवात झाल्याने नवशिक्षण घेतलेल्या बुद्धिप्रामाण्यवादी तरुण वर्ग येथील समाजात उदयास आला इंग्रजी ग्रंथाच्या अभ्यासामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, समानता, उदारमतवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, न्यायालयीन समानता या सारख्या मुलभूत तत्वांचे येथील समाजाला ज्ञान झाले. या काळात भारतीय समाजात प्रचलित असलेल्या जातिसंस्था, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, थिऑसॉफिकल सोसायटी, सत्यशोधक समाज इ. संघटनांनी भारतीय समाजात सामाजिक एकतेचे, नवविचारांचे, बुद्धिप्रामाण्यवादाचे विचार रुजविण्याचा प्रयत्न केला हिंदु समाजप्रमाणेच मुस्लिम, पारशी, शीखसमाजातही या सामाजिक व धार्मिक

सुधारणेची चळवळ गतिमान झाली असे दिसते या निरनिराळ्या संस्था व संघटनांनी केलेल्या कार्यामुळे तसेच दाखविलेल्या उदाहरणांमुळे समाजात काही प्रमाणात सामाजिक प्रबोधनाचे वातावरण निर्माण झाले.

एकोणीसावे शतक म्हणजे संमिश्र जीवनप्रेरणांचा आविष्कार झालेले शतक होते जुन्याचे आकर्षण या शतकात जेवढे होते तेवढेच नवजाणीचे आकर्षणही निर्माण झालेले होते. समाजजीवनात मोठ्याप्रमाणात येत असलेल्या नवप्रेरणा व समाजात प्रचलित असलेल्या परंपरा यामुळे समाजाची अवस्था मेझाद्या वावटळीत सापडल्या सारखी झाली होती परंपरेने चालत असलेल्या परंपरा यामुळे समाजाची अवस्था केवळ रूढीचे, उपासनांचे प्रेम समाजात असतानाच भौतिकशास्त्राची व सुखसमाधानाची ओढ या काळात लागलेली होती. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या आचार विचारांच्या आधारे जीवनाची वाटचाल करणे हे चूक की बरोबर या विषयी संभ्रमाच्या या शतकातील समाजाच्या मनात निर्माण झालेली होती धार्मिक आचारांच्या बंधनाचे वर्चस्व मान्य करणाऱ्या समाजाला ब्रिटीशांच्या आगमनामुळे सामाजिक जीवनातील नवीन आचार व विचारांचा प्रकाशज्योत जाणवू लागला होता. परंतु ब्रिटीशांच्या आगमनापूर्वी परंपरात जीवनगत संतुष्टता मानणाऱ्या भारतीय समाजाची प्रगती रोखली गेली होती व्हिको यांच्या मते, मानवाची सामाजिक प्रगती म्हणजे क्रांतिकारक होय. या वरून आपल्या समजून येईल कि १९ व्या शतकात अनेक बदल होत गेले

1) <u>जातीव्यवस्था</u> -

एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी समाजजीवनात असलेल्या चातुर्वर्ण्य पद्धतीचे जातीव्यवस्थेत रूपांतर झालेले होते. जातिव्यवस्थेमुळे समाज निरनिराळ्या गटांमध्ये विभागलेला होता. एका जातीत अनेक उपजाती विभागल्या गेल्या होत्या. या जातीमध्ये

व्यवसायांच्या स्वरूपानुसार किंवा देवदेवता व परंपरा यांच्याद्वारे श्रेष्ठ - कनिष्ठ विचार समाजात प्रस्थापित झालेले होते. प्रत्येक जातीचे विशिष्ट स्थान निश्चित केले होते. परंपरेनुसार प्रत्येक जातीला त्याचा स्थानानुसार काही हक्क, अधिकार, कर्तव्य ठरवून दिली होती प्रत्येक जातीने हा हक्क व कर्तव्याचे पालन करावे असे बंधनकारक होते. जातीत परस्पर संबंध, रोटीबेटी व्यवहाराचेही नियम ठरविले जाते. १७ व्या शतकात जातीसंस्थेत अडकलेल्या व्यक्तीचे समाजात स्वतंत्रपणे आचार-विचार करण्याचा अधिकार नव्हता. ब्राम्हण जातीला त्यांच्या श्रेष्ठत्वानुसार विशेषाधिकार मिळाले होते. या वर्गाला ज्ञान संपादन करण्याची संधी मिळत असे. त्यांना समान गुन्हासाठी विशेष सवलती मिळत. त्यामुळे कनिष्ठ जातींना कोणतीही संधी मिळत नसे. त्यांमुळे त्यांची अवस्था तत्कालीन काळात अत्यंत दयनीय होती.

2) <u>अस्पृश्यता</u> :-

या काळात जातिसंस्थेचा एक अविभाज्य घटक म्हणून अस्पृश्यतेकडे पाहिले जाई अस्पृश्य म्हणून मानल्या गेलेल्या समाजाला कडक बंधनांचे जीवन जगावे लागे या जातीला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता तसेच आर्थिक स्वयंपूर्णता निर्माण होण्यासाठी त्यांची स्थिती नव्हती त्यांना गुलामाप्रमाणे जीवन जगणे भाग पडे सार्वजनिक इमारती, देवालये किंवा पाणी पुरवठ्यांची ठिकाने येथे त्यांना प्रवेश नाकारला गेला होता (कारण) अस्पृश्यता जातीच्या स्पर्शाने विटाळ होतो ही कल्पना सामाजिक जीवनात दृढ झालेली होती.

एकोणीसाव्या शतकाच्या अगोदर भारतीय समाजाचे जातिसंस्थेद्वारे झालेले विघटन ब्रिटिशांना भारतात आपली सत्ता प्रस्थापित करण्यास उपयुक्त ठरली परकीय सत्तेचा केवळ समाजातील श्रेष्ठ जातीकडून भविष्यकाळात विरोध होण्याची शक्यता जाणवत्याणेच

ब्रिटीशांनी या जातींना विशेष सवलती देऊन प्रशासनात सहभागी करून घेण्याची व काही काळ त्यांचे परंपरागत अधिकार कायम टिकविण्याचे धोरण स्विकारले. तसेच ब्रिटीश भारतात सुरु केलेल्या दळणवळणाच्या सोयीमुळे सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया एकोणीसाव्या शतकात हळूहळू सुरु झाली. त्यामुळे जातिसंस्थेची बंधने काही प्रमाणात कमी होऊ लागली. त्याचबरोबर ब्रिटिश लष्करात कनिष्ठ जातीच्या लोकांना प्रवेश मिळणे शक्य झाल्याने परस्परसंबंधांच्या बाबतीत जातीची असलेली बंधने काही प्रमाणात कमी होण्यास सुरुवात झाली.

3] <u>कुटुंबसंस्था</u> -

एकोणीसाव्या शतकात सुरुवातीला भारतातील समाजात कुटुंब हाच सामाजिक जीवनाचा पाया होता. या काळात संयुक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात होती पितृसत्ताक पद्धती रूढ असल्याने कुटुंबातील वयोवृद्ध व अनुभवी व्यक्ती कुटुंबाचा प्रमुख असे कुटुंबातील सर्व सदस्यांचे पालनपोषण करणे ही कुटुंब प्रमुखाची जबाबदारी मानली जाई कुटुंबामध्ये आपल्या घराण्याच्या परंपराचा, धर्माच्या बंधनांचा काटेकोर पालन करण्याची रिवाज होता. शेती हाच या काळातील कुटुंबाचा व्यवसाय मानलेली असून शेतीवर कुटुंबातील फळ व वाटसदारांची सामुदायिक मालकी मानली जाई. कुटुंबातील परंपरागत हक्क, अधिकार वा संपत्तीची वाटणी या संबंधीच्या बाबती न्याय देण्याचे काम गोतसभा, ग्रामसभा किंवा ग्रामपंचायत करीत. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शहरी जीवनात विभक्त कुटुंबव्यवस्थेचे स्वरूपामध्ये काही झाले असले तरी ग्रामीण जीवनात संयुक्त कुटुंबपद्धती प्रचलित होती.

4) **स्त्री-जीवन** -

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातील एक मुलभूत घटक म्हणून स्त्रीकडे पाहिले जाई त्यांना सामाजिक व कौटुंबिक प्रतिष्ठा नव्हती अर्थात राधाबाई, गोपिकाबाई व अहिल्याबाई या सारख्या हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या स्त्रीयांना समाजात प्रतिष्ठा होती. तसेच राजघराण्यातील किंवा श्रीमंत वर्गातील काही स्त्रीयांना शिक्षण घेण्याचा अधिकार असला - सामाजिक व राजकीय जीवनात त्या सहभागी होत असल्या. तरी सामान्य स्त्रीयांची अवस्था दयनीय होती. या काळात बालविवाह प्रचलित असल्यामुळे अनेक स्त्रीयांना शिक्षणाचे हक्क मिळत नसे तसेच स्त्रीयांना वैधव्य प्राप्त होत. पुरुषप्रधान संस्कृती होती. या काळात बहुपत्नीकत्वाची पध्दत रुढ होती त्यामुळे पुरुष कोणत्याही वयात लग्न करू शकत होता. बहुपत्नीत्वाच्या व जबरदस्तीच्या विवाहाच्या पध्दतीमुळे स्त्रीयांचे जीवन अत्यंत दु:खद बनले होते.

मानवाच्या अधिकारपर्वाच्या मिळावर पाहिले - यानुसार स्त्रीयांच्या दयनिय स्थितीत बदल घडवून आणणे अत्यंत गरजेचे आहे, याची जाणीव होऊन समाजात प्रचलित असणाऱ्या कुप्रथा, सतीप्रथा, विधवांचे केशवपन या अनिष्ट परंपरा नष्ट करावयाच्या असतील तर स्त्रीयांना शिक्षण देणे हाच पर्याय आहे. याचे महत्त्व समाजात रुढ करण्यास सुरुवात झाली.

5) **सामाजिक वर्ग** -

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या आर्थिक स्थितीवर आधारलेले दोन वर्ग होते. श्रीमंत आणि गरीब श्रीमंतांची समाजातील संख्या कमी होती, तर गरीबांची संख्या जास्त होती. श्रीमंत वर्गामध्ये प्रामुख्याने वतनदार, देशमुख, जमीनदार, इनामदार, जहागीरदार, पाटील प्रशासकीय अधिकारी व व्यापारी वर्ग इ. चा समावेश होता. या वर्गांना परंपरेनुसार काही विशेष अधिकार

मिळालेले होते. या विशेष अधिकारामुळे त्यांच्याकडे प्रचंड संपत्ती जमा झाली होती. वतनदारांना त्यांच्या पराक्रमानुसार जमीन मिळाल्या. सावकार वर्ग आर्थिक साह्य करत असेल तरी त्यांच्या रूपात संपत्ती मिळवत. या शेतकऱ्यांना कर्जाच्या रक्कमेमुळे आपल्या शेतीवर पाहता शकल्या होत्या. यामुळे ते शेतमजूर म्हणून काम करत

ब्रिटिशांचे भारतात आगमन झाल्यानंतर तेथील सामाजिक विषमतेमध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल झालेले नव्हता. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ब्रिटिशांनी भारत ही वसाहत मानली होती. त्याची लूट करून संपत्ती इंग्लंडकडे नेणे हाच त्यांचा मुख्य उद्देश होता. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात व ब्रिटिश पार्लमेंटच्या काळात हेच धोरण स्विकारले गेले. उलट ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे येथील समाजात असलेला व्यापार, हस्त उद्योग व्यवसाय नष्ट झाले. या उलट दुष्काळ, अवर्षण किंवा पाणी पुरवठ्याच्या सोयीसाठी अतिवृष्टी या नैसर्गिक संकटाच्या प्रसंगी शेतसारा जुलूम जबरदस्तीने वसूल केला जात असे. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी व्यापारी हस्तउद्योग करणारे, प्रधान व्यावसायिक, शेतकरी, शेतमजूर यांची स्थिती दयनीय असून, सर्वत्र सामाजिक विषमता होती.

## ७) शिक्षण -

भारतात प्राचीन काळात नालंदा, तक्षशिला सारख्या विद्यापीठ परंपरा विकसित झाल्या होत्या. परंतु इस्लामी आक्रमणानंतर ही परंपरा खंडीत झाली होती. ब्रिटिशांच्या आगमानाच्या अगोदर भारतात काही पाठशाळा व मदरसा अस्तित्वात होत्या. तेथे धार्मिक परंपरा, धर्मग्रंथ व निती शिक्षण, आचार-विचार इ. चे

शिक्षण दिले जात असे. विज्ञान किंवा तंत्रज्ञान शिक्षणाचा अभाव होता. शिक्षणाच्या अभावामुळे समाजात अनिष्ट प्रथा, परंपरा, चालीरिती, अंधश्रद्धा यांचे वर्चस्व वाढले होते.

ब्रिटिशांनी भारतात आपली राजकीय सत्ता स्थिर केल्यानंतर येथील समाजाच्या विकासाच्या हेतूने शिक्षण प्रसाराला गती मिळाली. ईस्ट इंडिया कंपनीने शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली असली तरी शिक्षणाद्वारे प्रशासनातील कनिष्ठवर्ग उपलब्ध व्हावा ही ब्रिटिशांची प्रमुख भूमिका होती. तसेच आपल्या संस्कृतीचे श्रेष्ठत्व भारतीयांच्या लक्षात यावे हाही हेतू होता. असे असले तरी इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांना पाश्चिमात्य प्रगत ज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळाली.

- साक्षी लक्ष्मण कदम

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

17/20

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Signature of Supervisor

Suppliment No. : 1

Roll No. : 7019

Class : एम. ए. भाग I

Subject : भारतातील समाजसुधारकांचा इतिहास

Test / Tutorial No. :

Div. :

४. भारतातील समाजसुधारकांचा इतिहास

प्रश्न. १९ व्या शतकातील भारतीय समाजजीवनाची सविस्तर विश्लेषण करा.

→. आधुनिक भारताच्या इतिहासात एकोणिसावे शतक हे एक वैशिष्ट्यपूर्ण शतक आहे. भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवनाला वैशिष्ट्यपूर्ण वळण देण्याचे तसेच समाजात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्याचे कार्य या शतकाने केले.

ब्रिटिशांच्या भारतातील आगमनामुळे भारतात प्रामुख्याने प्रबोधनाचा व पुनरुज्जीवनाचा कालखंड सुरू झाला.

इंग्रजी ग्रंथांच्या अभ्यासामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, समानता, उदारमतवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, न्यायालयीन समानता या सारख्या मूलभूत मूलभूत तत्त्वांचे येथील समाजाला ज्ञान दिले/झाले.

- भारतीय समाजात प्रचलित असलेल्या जातिसंस्था, अंधश्रद्धा-धवादी विचार, अनिष्ट रूढी - परंपरा दूर केल्याशिवाय भारतीय समाजाची प्रगती होऊ शकणार याची तरुणांना जाणीव झाली. त्यातूनच समाजसुधारणेला गती मिळाली.

- ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्यसमाज, थिऑसॉफिकल सोसायटी, सत्यशोधक समाज इत्यादी संघटनांनी भारतीय समाजात एकतेचे नवविचारांचे, बुद्धिप्रामाण्यवादाचे विचार रुजविण्याचा प्रयत्न केला.

- हिंदू समाजाप्रमाणेच मुस्लिम, पारशी, शीखसमाजातही या सामाजिक

व धार्मिक सुधारणेची चळवळ गतिमान झाली असे दिसते. या निरनिराळ्या संस्था व सुधारकांनी केलेल्या कार्यामुळे त्यांच्या दाखविलेल्या उदाहरणांमुळे समाजात काही प्रमाणात सामाजिक एकतेचे वातावरण निर्माण झाले.

- एकोणिसाव्या शतकापर्यंत भारतात सुव्यवस्थित व योजनाबद्ध अशी कार्यक्षम शासन पद्धतीची स्थापना करण्यात ब्रिटिशांनी यश मिळविले होते / त्यांना यश आलेले होते. त्यामुळे परंपरेने राजकीय जीवनात निर्माण झालेली अव्यवस्था, अराजक व अशांततेचा कालखंड संपलेला होता. परस्परांतील संघर्षात गुंतलेल्या सत्ताधिशांचे राजकीय वर्चस्व नष्ट होवून समाजातील सर्व घटकांना समानतेची वागणूक देणाऱ्या नव्या शासनव्यवस्थेने या शतकात नव्या युगाचा प्रारंभ केलेला होता.

शासनकर्ते व शासित प्रजा यांच्यातील परस्पर संबंधामुळे सामाजिक परिवर्तन घडून येण्यास सुरुवात झाली.

- सामाजिक सुधारणांची प्रक्रिया एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी भारतात सुरु होण्यास प्रामुख्याने पुढील काही मोठी कारणीभूत ठरल्या.

① भारतीय समाजातील अवनती दूर करणे.

ब्रिटिशांच्या नवीन शासनयंत्रणेने भारतात एकछत्री अंमल आणणारी राजवट येथे प्रस्थापित केली. त्यांच्या राजवटीच्या व ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या संपर्कात आलेल्या काही भारतीयांना त्यांच्या भौतिक विकासाचे गमक लक्षात आले. त्यांच्या तुलनेने भारतीय समाजाची अवनती त्यांना प्रकर्षाने जाणवू लागली. भारतीय समाजात पसरलेली अस्वस्थ नाहीशी करावयाची असेल तर त्या समाजात पाश्चात्य विचारांचे नवे वारे आणणे गरजेचे आहे. असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांना समाजसुधारणा आवश्यक वाटू लागली.

② प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाची गरज.

पौर्वात्य संस्कृती व धर्म यांचा सखोल अभ्यास करणाऱ्या काही अभ्यासकांनी आणि संशोधकांनी भारताचा भूतकाल किती श्रेष्ठ, उज्ज्वल आणि अभिमानास्पद आहे. याची लोकांना ओळख करुन दिली. स्वामी विवेकानंद सारख्या थोर चिंतनशील व्यक्तींनी भारतीय अध्यात्मवादाचे श्रेष्ठत्व

प्रतिपादन केले. भूतकाळाकडे पहाण्याची नविन उज्वल दृष्टी दिली.

③ प्राचीन भारतीय वाङ्मयाचा अभ्यास व संशोधनाची गरज

प्राचीन वाङ्मय व पाश्चिमात्य वाङ्मय यांचा तुलनात्मक अभ्यास करुन प्राचीन संस्कृती वाङ्मयातील महत्वपूर्ण गोष्टी आधुनिक संस्कृतीसमोर ठेवल्या व त्यांनी जुन्या व नव्या वाङ्मयीन मूल्यांचा संयोग घडवून आणला. त्याचबरोबर भारतीयांना आपल्या प्राचीन वाङ्मयीन कृतींच्या बद्दल अभिमान, स्वाभिमान, वैभवशाली गोष्टी इ. संदर्भात भावना प्रज्वलित केल्या.

④ हिंदू धर्माबाबत अभिमान जागृत करणे.

या काळात महत्वाची बाब म्हणजे ब्रिटिशांबरोबर आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्याचा काही सुजाण भारतीयांवर झालेला परिणाम. मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या भारतीय तरुणांना उदारमतवादी, पुरोगामी विचारसरणीचे बाळकडू इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून मिळू लागले या विचारप्रणालीत त्यांना भारतीय समाजाच्या पुनरुज्जीवनाची गुरुकिल्ली सापडली. कारण ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराचे कार्य करीत असताना हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, इ. वर कठोर टीका केली. त्यामुळे हिंदू जनतेला आपल्या धर्मातील दोष आणि वाईट बाबी, अयोग्य विचारसरणी समजली. त्याचबरोबर हिंदू धर्माची / धर्मातील अद्वैतवाद, निष्काम कर्म, त्याग इ. चांगल्या तत्वांचीही जाणीव झाली. त्यामुळे हिंदू धर्मातील दोष दूर करुन चांगल्या तत्वांचा परिपाठ करण्याची इच्छा हिंदू धर्मीयांच्यामध्ये निर्माण झाली. त्याचबरोबर हिंदू धर्माबद्दल प्रेम आत्मीयही निर्माण झाली.

थोडक्यात ख्रिश्चन मिशनरींच्या हिंदू धर्मविरोधामुळे येथील लोकांच्यात आपल्या धर्माविषयी गर्व निर्माण होवून चांगल्या बदलाची आवश्यकता निर्माण झाली.

⑤ ख्रिश्चन धर्मप्रसाराचा परिणाम.

ख्रिश्चन धर्मगुरूंनी त्यांच्या चालविलेल्या धर्मप्रसार व मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या शाळा यामुळे काही आंग्लशिक्षित भारतीय तरुण पाश्चात्य विचार प्रवाहात इतके वाहून गेले की आपले ते सर्व हीन व त्याज्य मानण्याची आणि पाश्चात्यांचे

शकेल असेल, शिक्षण घेऊन त्याने इंग्रजानुकूल बनण्याची पद्धती त्यांच्यात निर्माण झाली. परंतु, या लोकांच्यापैकी फार भारतीय समाजप्रवाहा बाहेर पडला नाही. भारतीय समाजाचे नेतृत्व त्यांना करता आले नाही. या उलट काही आंग्लविद्याविभूषित भारतीय पाश्चात्य विचारसरणीने प्रभावित झाले असेल तरी त्यांच्यात रुजलेली भारतीयत्वाची मुळे नष्ट झाली नाहीत. या उलट मिशनऱ्यांनी हिंदू धर्मावर चालविलेल्या हल्ल्यामुळे त्यांच्यातील विवेक जागृत झाला. त्यांनी पाश्चात्यांच्या शास्त्रीय, चिकित्सक व पुरोगामी दृष्टिकोन स्वीकारून भारतीय धर्मव्यवस्थेचा, समाजव्यवस्थेचा अभ्यास करून त्यातील अनिष्ट चालीरीती, रूढी-परंपरा, कर्मकांड, ढोंगीपणा दूर करून मूळ धर्मतत्त्वांवर चढलेली हटक अंधश्रद्धेची पुट काढून टाकून त्या धर्मतत्त्वांची लोकांना ओळख पटवून देऊन, पाश्चात्य विचारप्रणालीतील चांगल्या व योग्य तेवढ्याच गोष्टी स्वीकारून त्या आधारे निर्दोषी, गतिमान, विकसनशील समाज उभा करण्याची जाणीव त्यांना होऊ लागली. त्यातून काही समाजाभिमुख आंग्लशिक्षित भारतीयांनी विविध माध्यमांद्वारे आपले विचार प्रकट करण्यास प्रारंभ केला. त्यांनीच भारतात धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनास प्रारंभ केला. ते भारतीय समाजाच्या सर्वांगीण जागरणाचे प्रणेते ठरले.

## एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीचा भारतीय समाज -

एकोणिसावे शतक म्हणजे संमिश्र जीवनप्रेरणांचा आविष्कार झालेले शतक होते. जुन्याचे आकर्षण या शतकात जेवढे होते तेवढेच नव्याचे आकर्षणही निर्माण झालेले होते. समाजजीवनात मोठ्याप्र येत असलेल्या नवप्रेरणा व समाजात प्रचलित असलेल्या परंपरा यामुळे समाजाची अवस्था एखाद्या वाळवंटात सापडल्या सारखी झाली होती. परंपरेने चालत आलेल्या रूढींचे, उपासनांचे प्रेम समाजात असतानाच भौतिकशास्त्रांची व सुखसमाधानाची ओढ या काळात लागलेली होती. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या आचारविचारांच्या आधारे जीवनाची वाटचाल करणे हे चूक की बरोबर या.

विषयी संभ्रमावस्था या शतकातील समाजाच्या मनात निर्माण झालेली होती. धार्मिक आचारांच्या विविध बंधनांचे वर्चस्व मान्य करणाऱ्या समाजाला ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी परंपरागत ~~[illegible]~~ जीवनातच संतुष्टता मानणाऱ्या भारतीय समाजाची प्रगती रोखली गेली होती.

* जाती संस्था-

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी समाजजीवनात असलेल्या चातुर्वर्ण्य पद्धतीचे जातिसंस्थेत रूपांतर झालेले होते. जातिसंस्थेमुळे समाज निरनिराळ्या गटांमध्ये विभागलेला होता. एका जातीत अनेक उपजाती निर्माण झाल्या होत्या. या जातींच्यामध्ये व्यवसायांच्या स्वरूपावरून किंवा देवदेवता व परंपरा यांच्याबाबत श्रेष्ठ-कनिष्ठ विचार समाजात प्रस्थापित झालेले होते. प्रत्येक जातीचे विशिष्ठ स्थान निश्चित केलेले होते. त्यामुळे सामाजिक एकतेची जाणीव नाहीशी झालेली होती. परंपरेनुसार प्रत्येक जातीला त्याच्या स्थानानुसार काही हक्क, अधिकार, कर्तव्य ठरवून दिली होती. प्रत्येक जातीने या हक्क व कर्तव्याचे पालन करावे असे बंधन घातलेले होते. जातीतील परस्पर संबंध, रोटीबेटी व्यवहाराचेही नियम ठरविलेले होते. या नियमांना धर्मग्रंथातील विचार व आचारांचे तसेच ऐतिहासिक परंपरेचे दाखले दिलेले होते. जातीतील एखाद्या व्यक्तीने वरील बंधनांचे उल्लंघन केल्यास त्याला बहिष्कृत केले जाई. बहिष्कृत ही शिक्षा अत्यंत मानहानिकारक मानली जाई. त्यामुळे १९ व्या शतकात जातिसंस्थेत अडकलेल्या व्यक्तीला समाजात स्वतंत्रपणे आचार-विचार करण्याचा अधिकार नव्हता. जातिसंस्थेत जन्म हाच मुख्य घटक मानण्यात आल्याने व्यक्तीने स्वातंत्र्य पूर्णपणे नष्ट झाले. त्यामध्ये ब्राम्हण जातीला त्यांच्या श्रेष्ठत्वातून विशेषाधिकार मिळाले होते. या वर्गाला ज्ञान संपादन करण्याची संधी मिळत असे. शिक्षणामुळे प्रशासनात सहभागी होणे त्यांना सहज शक्य असे. तसेच न्यायदानाच्या बाबतीत त्यांना समान गुन्ह्यालाही विशेष सवलती मिळत. त्यामुळे कनिष्ठ जातींना शिक्षणाची कोणतीच संधी मिळत नसे. केवळ परंपरागत व्यवसाय करणे. व वरिष्ठ जातींची सेवा करणे हे कनिष्ठ वर्गाचे कर्तव्य समजले जाई. समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून व मानवतेच्या दृष्टीने आवश्यक असलेले मूलभूत हक्कही कनिष्ठ जातींना मिळत नसत. त्यामुळे त्यांची अवस्था तत्कालीन काळात अत्यंत दयनीय होती.

"Neem has anti-bacterial properties which remove pimple-causing bacteria"

15/20

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

| | |
|---|---|
| **SUPPLIMENT** | Signature of Supervisor |
| Suppliment No. : M.A. HISTORY | Subject : पेपर क्र 4 - भारतातील समाज सुधारकांचा इतिहास |
| Roll No. : 7022 | Test / Tutorial No. : |
| Class : Sourabh Anil Kamble | Div. : |

1) १९ व्या शतकातील भारतीय समाजजीवनाचे सटिक विश्लेषण करा.

आधुनिक भारताच्या इतिहासात १९ शतक हे एक वैशिष्टपूर्ण शतक आहे. भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवनाला वैशिष्टपूर्ण वळण देण्याचे तसेच समाजात महत्वपूर्ण बदल घडवून आणण्याचे कार्य या शतकाने केले. ब्रिटिशांच्या भारतातील आगमनाने भारतात प्रामुख्याने प्रबोधनाचा व पुनरूजीवनचा कालखंड सुरू झाला. इग्रजी शिक्षणाची सुरूवात झाल्याने नवशिक्षण घेतलेल्या बुद्धिप्रामाण्यावाद, न्यायालीन समानता या भारतीय समाजाचे निरीक्षण करण्यात सुरूवात केले.

* १९ व्या शतकाच्या सुरूवातीच्या भारतीय समाज

१९ व्या शतक म्हणजे समिश्र जीवन प्रेरणा असलेले शतक होय जुन्याने आकर्षण या शतकात जेवढे होते, समाजजीवनात मांडण्यात येत असलेल्या परंपरा यामुळे असलेल्या नवप्रेरणा व समाजात प्रचलित आसलेल्या परंपरा यामुळे समाजाची अवस्था एखादया वाळवटात सापडल्या सारखी होती.

① जातीसंस्था :

१९ शतकाच्या प्रारंभी समाजजीवनात असलेल्या चातुर्वण्य पद्धतीचा जातीसंस्था रूपातर झालेले होते, जातीसंस्थेमुळे समाज निरनिराळ्या गटामध्ये विभागलेला होता, एका जातीत अनेक उपजाती

निर्माण झाल्या होत्या. या जातींच्यामध्ये व्यवसायाच्या स्वरूपावरून किंवा देवदेवता व परंपरा यांच्याद्वारे श्रेष्ठ कनिष्ठ विचार समाजात प्रस्थापित झाले समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून व मानवतेच्या दृष्टीने आवश्यक असलेले मुलभूत हक्कही कनिष्ठ जातींना मिळत नसत त्यामुळे त्यांची अवस्था तात्कालीन काळात अत्यंत दयनिय ~~झाली~~ झाली,

2) ~~अस्पृश्य~~ अस्पृश्यता :

या काळात जातीसंस्थेचा एक अविभाज्य घटक म्हणून अस्पृश्यतेकडे पाहिले जाई अस्पृश्य म्हणून मानल्या गेलेल्या समाजाला कडक बंधनाचे जीवन जगावे लागले, या जातीला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता, तसेच आर्थिक स्वयंपुर्णता निर्माण होण्यासाठी त्याची स्थिती नव्हती त्यांना गुलामाप्रमाणे जीवन जगणे भाग पडे, सार्वजनिक इमारती देवालये किंवा पाणी पुरवठ्याची ठिकाणे इथे त्यांना प्रवेश नाकारला गेला होता कारण अस्पृश्य जातीच्या स्पर्शामुळे विटाळ होतो, ही कल्पना सामाजिक जीवनात रूढ झालेली होती,

3) स्त्रीजीवन :

